बाजीराव बल्लाळानें आपला अवतार संपविला. बाजीरावाच्या पश्चात् राज्याची धुरा बाळाजी बाजीरावानें उचलली. १७४० पासून १७५० पर्यंत बाजीरावानें जिंकिलेल्या प्रदेशांची

---

श्री.

यादी मतलब करून घेणें.

स्वराज्य थोरले कैलासवासी स्वामींचेप्रमाणें "रायगडावरकड" गडकोट देखील करून घेणें.

ठाणीं मागोन घेणें.

१ खटाव.

१ आकलुज.

१ कासेगांव.

१ सांगोलें.

१ मंगळवेढें.

१ नाझरें.

१ मिरज.

१ चाकण.

१ पेडगांव.

१ " बालेगड. "

१ जुन्नर " समेत " किल्ले.

१ कल्याण भिवंडी "समेत" किल्ले.

१ चेऊल "समेत" किल्ले.

---

३

"तालुके" दरसंस्थानीं करून "घेतला" त्याची चौथाई करून घेणें.

नवाब " बाकीखानाची " दौलत फत्तेसिंगबाबाचे नांवें करून घेणें.

चांदाचें राज्य कान्हेजी भोंसले यांणीं साधिलें आहे, तें स्वराज्यांत करून घेणें.

" चंदीप्रांतांचें राज्य गडकोट देखील करून घेणें. मातोश्री व " मर्दानसिंग " देखील " कदीम " व दुर्गाबाई, जानकीबाई व सेवक लोक " मागील " घेणें.

पेशजी मतलब लिहून दिले आहेत, त्याचे फर्मान सनदा करून घेणें.

कोंकणपट्टी देखील राजपुरी चौथ व सरदेशमुखी, स्वराज्य व वरकड " साधले " त्याचे फर्मान " पृथक् कोरे " करून घेणें.

सरदेशमुखीस इनाम दरमहा "कसगांव" करून घेणें.

जैसिंग पालकर येतील तरी मागोन घेणें.

त्रिंबक मागोन घेणें.

" सांभाळून " याखेरीज गुजराथ माळवा साधेल तेथवर साधणें.

येणेंप्रमाणें खमखाम करून घेणें. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा. मोर्तब असे.

मोडी वाचण्याच्या चुका ह्या एका पत्रांत सुमारें १६।१७ झाल्या आहेत. भारतवर्षाच्या संपादकांनीं काव्येतिहाससंग्रहांतील यादी वाचण्याची खटपट केली असती तर ह्या चुका